OK

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय** : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. स्थायी समिती सभा<br>दि. ७/२/२०११ |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : मुळप्रत

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | प्र.क्र. ११५ ते १२० |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय, .
दिनांक :- ०५/०२/२०११.

## मा. विशेष स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- १६ दिनांक ०५/०२/२०११**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा सोमवार दि. ०७/०२/२०११ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १६, दि. ०५/०२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका


# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १६, दि. ०५/०२/२०११ सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. ०७/०२/२०११**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ११५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण कराच्या (विशेष शिक्षण कर) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. (१% ऐवजी २%) |
| ११६ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत. |
| ११७ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत (२८% वरील ३०% पर्यंत वाढ) |
| ११८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये अग्निशमन दलाकडून आलेल्या महसुलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. |
| ११९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये पाणीपट्टी दरात व इतर शुल्कात वाढ करणेबाबत. |
| १२० | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात कराचे दर वाढविणेबाबत. |

**दिनांक :- ०५/०२/२०११.**

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १६, दि. ०५/०२/२०११ सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. ०७/०२/२०११**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज -** |
| ११५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण कराच्या (विशेष शिक्षण कर) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. (१% ऐवजी २%) |
| ११६ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार ''मलप्रवाह सुविधा लाभ कर'' लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत. |
| ११७ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत (२८% वरील ३०% पर्यंत वाढ) |
| ११८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये अग्निशमन दलाकडून आलेल्या महसुलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. |
| ११९ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये पाणीपट्टी दरात व इतर शुल्कात वाढ करणेबाबत. |
| १२० | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात कराचे दर वाढविणेबाबत. |

**दिनांक :- ०५/०२/२०११.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

---

जा.क्र मनपा/आयुक्त/३४६/२०१०-११ दिनांक :-०५/०२/२०११.

**// तातडीचे //**

**प्रति,**
**मा. सभापती सो.,**
**स्थायी समिती,**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- नविन कर लागु करणे व मालमत्ता करवाढीच्या विषयावर विशेष स्थायी समिती सभा आयोजित करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मालमत्ता करामध्ये दरवाढ करणे आवश्यक आहे. तसेच नविन कर लागु करणे आवश्यक आहे. याकरिता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३(क) नुसार स्थायी समितीची २४ तासाच्या आत विशेष सभेचे आयोजन करण्यात यावे ही विनंती.

**विषय :-**

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण कराच्या (विशेष शिक्षण कर) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणेबाबत. (१% ऐवजी २%)

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत.

३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत (२८% वरील ३०% पर्यंत वाढ)

४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये अग्निशमन दलाकडून आलेल्या महसुलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

५) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये पाणीपट्टी दरात व इतर शुल्कात वाढ करणेबाबत.

६) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात कराचे दर वाढविणेबाबत.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ७/२ /२०११

## ।। गोषवारा।।

**प्रकरण क्र. ११५ :- मनपा शिक्षण कराच्या (विशेष शिक्षण कर) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत.**

**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचालित एकुण ३४ शाळा (विविध माध्यम) असून त्यातुन १०३४३ गोरगरीब विद्यार्थ्यांना मनपातर्फे मोफत शिक्षण दिले जाते. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना गणवेश, प्रश्नपत्रिका/उत्तरपत्रिका, शालेय क्रिडा स्पर्धा, संगणक प्रशिक्षण, सास्कृतिक व ऐतिहासीक सहल इ. भौतिक सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या जातात.

दरवर्षी दोन जून्या शाळा पाडुन नव्याने (आर.सी.सी.) सिमेंट क्राँक्रेटच्या इमारती (शाळा) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधल्या जातात व काही जून्या शाळांची दुरुस्ती केली जाते. त्यासाठी अंदाजे रु. २ कोटी खर्च होतो. शाळेतील सर्व शिक्षकांच्या वेतनाकरीता, सेवा निवृत्ती वेतन, वैद्यकिय प्रतिपुर्ती, उपदान, अंशराशी करण तसेच ६ व्या वेतन आयोगातील वेतनाचा फरकांची रक्कम हा सर्व खर्च अंदाजे रु. ९.४० कोटी एवढा असून शासनाकडुन ५०% अनुदान प्राप्त होत असते, व ५०% खर्च महानगरपालिकेस करावा लागत असून हा खर्च अंदाजे रु. ४.७० कोटी आहे. सन २००९-१० या वर्षात विशेष शिक्षण करामार्फत रु. १ कोटी ७० लाख रुपये उत्पन्नाचा अंदाज अर्थसंकल्पात दाखविण्यांत आला आहे. तसेच इमारत भाडयापोटी शासनाकडुन सन १९९४ ते १९९८ पर्यंत ५०% प्रमाणे रु. ८७,९१,३८०/- प्राप्त झाले आहेत व शासनाकडुन त्यानंतरचे रु. ४,७४,७३,४५२/- शाळा गृह भाडे येणे बाकी आहे. उत्पन्नाचे तुलनेत खर्च फारच अधिक आहे.

मा. महासभा ठराव क्र. ६८ अन्वये ३१/०३/२०१० रोजी विशेष शिक्षण करात १% करवाढ करण्यात आली होती. मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० रोजीचा ठराव शासनाने क्र. मिभामनपा/ १११०/५३८/प्रक्र९३/२०१०/नवि-२८ दि. १८/०१/११ अन्वये निलंबीत केला आहे. परिणामी शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या शाळांकरीता करावयाच्या विकास कामांवर त्याचा परिणाम झाला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेउन विशेष शिक्षण कर १% ऐवजी २% प्रमाणे शिक्षण करामध्ये वाढ केल्यास महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या विकासकामांकरीता निधी उपलब्ध होणार आहे. विशेष शिक्षण कर १% ऐवजी २% केल्यास महानगरपालिकेस अंदाजे एकुण रु. २.८० कोटीचे उत्पन्न मिळु शकेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या कोणत्याही करात अनुपुरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेने या आर्थिक वर्षात शिक्षण कर करयोग्य मूल्याच्या १% वरुन २% करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे मा. स्थायी समितीपुढे निर्णय घेण्यास शिफारस असे.

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि. ५/२/९९

5/2/99

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ७ / २ /२०११

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ११६ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत.
(मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन अंतर्गत रु. १९०० कोटीचे विविध प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन अंतर्गत सामंजस्य करारामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९(बब) नुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर लागु करण्याची तरतुद आहे. उक्त तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने अद्याप "मलप्रवाह सुविधा लाभ" कर लागू केला नसल्याने, हया बाबत लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदविलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत भुयारी गटार योजनोचा रु. ४९१ कोटीचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाकरीता महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.ए. कडुन रु. २२६ कोटीचे कर्ज घेतले आहे. या प्रकल्पाकरीता एकुण ५०% निधी महानगरपालिकेने उभा करावयाचा आहे. या दृष्टीने भांडवल निर्मिती करणे, कर्जाचे हफ्ते भरणे, प्रकल्प निर्मीतीनंतर देखभाल दुरुस्ती करणे करीता निधीची आवश्यकता लागणार आहे. याकरीता मलप्रवाह सुविधा लाभ कर सर्व मालमत्ता धारकांस लागू करणे आवश्यक आहे. करयोग्य मूल्याच्या ८% प्रमाणे हा कर लागू केल्यास महानगरपालिकेस अंदाजे रु. ११.२० कोटी एवढे वार्षिक उत्पन्न अपेक्षित आहे.

मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० अन्वये "मलप्रवाह सुविधा लाभ कर" हा कर नव्याने प्रस्तावित करण्यात आला होता. तथापी मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० रोजीचा ठराव, शासनाने क्र. मिभामनपा/१११०/५३८/प्रक्र९३/२०१०/नवि-२८ दि. १८/०१/११ अन्वये निलंबीत केला आहे. परिणामी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तरी वरील सर्व बाबी विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) मध्ये "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू आहे. तरी करयोग्य मूल्याच्या ८% प्रमाणे मलप्रवाह सुविधा लाभ कर सर्व मालमत्ता धारकांना आकारणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या कोणत्याही करात अनुपुरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेने या आर्थिक वर्षात सर्व मालमत्तांना करयोग्य मूल्याच्या ८% प्रमाणे मलप्रवाह सुविधा लाभ कर आकारणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे मा. स्थायी समितीपुढे निर्णय घेण्यास शिफारस असे.

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

५८

प्राप्त दि. ६/२/९९

[illegible signature]

६/२/९९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ७/२ /२०११

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ५१७ :- मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत.**
**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मालमत्ता कर हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कराचा दर सन २००२-०३ पर्यत २५% होता, तो २००३-०४ पासून २८% केलेला असून अद्यापपर्यंत तोच दर कायम आहे. सध्या मालमत्ता कराचे २८% प्रमाणे प्रतिवर्षी रक्कम रु. ३७.०० कोटी इतके उत्पन्न मिळत आहे. परंतु जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) या प्रकल्पाचा खर्च, त्यासाठी घ्यावी लागणारी कर्जे व त्याच्या परतफेडीसठी लागणारा निधी विचारात घेता हे उत्पन्न अपुरे पडणार आहे. तसेच १ एप्रिल २०१० पासून "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्याने जकाती पासून मिळणारे उत्पन्नांपैकी स्थानिक संस्था कराचे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होत नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध प्रकल्पांसाठी कर्ज घेतले असून त्या कर्जाची रक्कम रु. २९३ कोटी आहे. महानगरपालिकेस प्रतिवर्षी कर्ज परतफेड हफ्ता, वेतन भत्ते, पाणी बिल, विज बिल, प्राथमिक आरोग्य केंद्र चालविणे इ. कामी रु. १०० कोटी प्रतीवर्षी खर्च होत आहे. यामुळे निधी उपलब्ध करणेकामी मालमत्ता कराच्या दरात वाढ करणे अत्यावश्यक आहे.

विविध प्रकल्पांना लागणारा निधी, कर्ज परतफेडीसठी लागणारा निधी, जकात बंद झाल्यानंतर उत्पन्नात होणारी घट विचारात घेता मालमत्ता कराच्या दरामध्ये वाढ करणे आवश्यक असल्याने सध्या असलेल्या सध्या मालमत्ता कराच्या दरामध्ये खालीलप्रमाणे मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० अन्वये करवाढ करण्यांत आली होती.

| करयोग्य मूल्य | जूने दर | नविन दर |
|---|---|---|
| १ ते १२००० | २८% | ३०% |
| १२००१ ते ३०००० | २८% | ३२% |
| ३०००१ ते ५०००० | २८% | ३५% |
| ५०००१ पेक्षा जास्त | २८% | ३८% |

तथापी मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० रोजीचा ठराव शासनाने क्र. मिभामनपा/१११०/५३८/प्रक्र९३/२०१०/नवि-२८ दि. १८/०१/११ अन्वये निलंबीत केला आहे. वरील तक्त्यामध्ये करयोग्य मूल्याच्या टप्पाबाबत सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी दि. १०/०१/२०११ रोजी पत्र देउन सदर दरांत समानता आणावी अशी विनंती केली आहेत. तसेच वरील तक्त्याप्रमाणे केलेली वाढ रद्द करुन सर्व मालमत्तांना ३०% दराप्रमाणे सर्व मालमत्ता धारकांना एक समान प्रमाणे कर आकारणी होईल.

वरील सर्व नमुद केलेल्या बाबींचा विचार करता महानगरपालिकेस प्रतिवर्षी कर्ज परतफेड हफ्ता, वेतन भत्ते, पाणी बिल, विज बिल, प्राथमिक आरोग्य केंद्र चालविणे आदी कामांकरीता निधी आवश्यक आहे. तरी सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून महानगरपालिकेतील सर्व (जून्या व नविन) मालमत्तांना करयोग्य मूल्याच्या ३०% प्रमाणे वाढ केल्यास महानगरपालिकेस अंदाजे रु. ३ कोटीचे उत्पन्न मिळु शकेल तरी मालमत्ता कराच्या (घरपट्टी) कराच्या दरात वाढ करणे करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या कोणत्याही करात अनुपुरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेने या आर्थिक वर्षात सर्व मालमत्तांना करयोग्य मूल्याच्या ३०% प्रमाणे घरपट्टी कर आकारणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे मा. स्थायी समितीपुढे निर्णय घेण्यास शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि. ५।२।९७

[illegible signature]
५।२।९७

# मिरा भाईदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि.८/२/२०११

## // गोषवारा //

**विषय** :- अग्निशमन दलाकडून आलेल्या महसुलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणे.
(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये)

प्रकरण क्र. २५८

~~ठराव क्र.~~ ( - )

मिरा भाईदर क्षेत्रात उंच इमारती बांधण्याचे काम वेगात सुरू आहे. अग्निशमन दलाकडे असलेल्या अपुरा कर्मचारी वर्ग व अपुरी साधनसामुग्री लक्षात घेउन अग्निशमन दलासाठी अधिकचे मनुष्यबळ व अत्याधुनिक साधनसामुग्री खरेदी आवश्यक आहे.

सदर बाबत अग्निशमन दलाकडून खालीलप्रमाणे महसुल गोळा करण्यात येतो.

१) अग्निशमन कर

२) कॅपिटेशन फि

३) इन्सपेक्शन फि / दाखला फि

सध्या अग्निशमन कर हा मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर १ % प्रमाणे घेण्यात येत आहे. तसेच विविध उंचीच्या इमारतींवर वेगवेगळया दराने कॅपीटेशन फि आकारण्यात येते. तसेच दाखला फि सुध्दा वेगवेगळया दराने आकरण्यात येते.

आपत्कालीन परिस्थितीमध्ये उंच इमारतीमधील आग विझविणे किंवा लोकांची सुटका करणेसाठी अत्याधुनिक असे एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) हे वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. सदर वाहनांची बाजार भावात अंदाजे किंमत रू. ८.०० कोटी एवढी आहे. तसेच अग्निशमन स्थानके उभारणे व त्याकरिता लागणारे अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे लागणार आहे.

सध्या अग्निशमन दलाकडे पुढीलप्रमाणे महसुल जमा होत आहे.

१) अग्निशमन कर १ % प्रमाणे अंदाजे १५०.०० लाख

२) कॅपिटेशन फि अंदाजे ५००.००लाख

३) इन्सपेक्शन फि / दाखला फि अंदाजे ३.०० लाख

अशा प्रकारे अग्निशमन दलाकडून रू. ६.०३ कोटी एवढे उत्पन्न महानगरपालिकेस मिळते. जर सोबत जोडलेल्या प्रस्तावाप्रमाणे अग्निशमन कर हा मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर २ % तसेच कॅपिटेशन फि व दाखला फि यामध्ये दाखविलेल्या दर वाढीस मंजूरी मिळाल्यास अग्निशमन दलाकडील उत्पन्नात दुप्पटीने भर पडुन भविष्यात अग्निशमन दलास लागणारे मनुष्यबळ व अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करणे सोयीचे होईल.

तरी सोबत सादर केलेल्या दरवाढीच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती सभेची मंजूरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७ | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर |
|---|---|---|---|
| | तपशील | | तपशील |
| १) कॅपीटेशन फी | अ)<br>१. १५ मिटर ते २४ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. २०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | १) कॅपीटेशन फी | अ)<br>१. १५ मिटर ते २४ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ३०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | २. १ ते १५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ४०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ **१०००** चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे १५ ते २४ मी. उंच निवासी इमारतीमध्ये असलेल्या अनिवासी / व्यापारी क्षेत्रफळासाठी प्रती मंजूर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. **५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. | | २. १ ते १५ मी. उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ **१०००** चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे १५ ते २४ मी. उंच निवासी इमारतीमध्ये असलेल्या अनिवासी / व्यापारी क्षेत्रफळासाठी प्रती मंजूर चौ. मी. क्षेत्रफळासाठी रु. **५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| | ३. १५ मिटर ते २४ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ४०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु.४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | ३. १५ मिटर ते २४ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु.४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | ४. शैक्षणिक, समाज मंदिर व दवाखाने इत्यादि इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी **रु. २०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ **१,०००** चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | ४. शैक्षणिक, समाज मंदिर व दवाखाने इत्यादि इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी **रु. ३०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ **१,०००** चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७<br><br>तपशील | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर<br><br>तपशील |
|---|---|---|---|
| | **५.** लॉजिंग बोर्डींग, हॉटेल इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी **रु. ४०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | **५.** लॉजिंग बोर्डींग, हॉटेल इत्यादी इमारतीसाठी प्रती चौ. मी. मंजुर क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ४०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| **१) कॅपीटेशन फी** | **ब)**<br>**१.** २४ मिटर ते ३५ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ५०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | **१) कॅपीटेशन फी** | **ब)**<br>**१.** २४ मिटर ते ३५ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ७५/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ५०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे २४ ते ३५ मिटर उंच निवासी इमारतीतील अनिवासी क्षेत्राकरिता प्रती मंजूर चौ.मी. क्षेत्रफळासाठी रु. २५०/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| | **२.** २४ मिटर ते ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. २००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | **२.** २४ मिटर ते ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. २००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. २,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |
| | **३.** ३५ मिटर ते ४५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी.परंतु मंजुर क्षेत्रफळ **१०००** चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. **१,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | **३.** ३५ मिटर ते ४५ मिटर उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी.परंतु मंजुर क्षेत्रफळ **१०००** चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी रु. **१,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे ३५ ते ४५ मिटर उंच निवासी इमारतीतील अनिवासी क्षेत्राकरिता प्रती मंजूर चौ.मी. क्षेत्रफळासाठी रु. २००/- प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |

| | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७ | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर |
|---|---|---|---|
| | तपशील | | तपशील |
| | | | <u>३.१.</u> ४५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. २००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. १,५०,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. त्याचप्रमाणे ४५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीतील अनिवासी क्षेत्राकरिता प्रती मंजूर चौ.मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| | ४. ४५ मिटर उंच अनिवासी इमारतीसाठी प्रती चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. ५००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. परंतु मंजुर क्षेत्रफळ १००० चौ. मी. पेक्षा कमी असल्यास कमीत कमी **रु. ५,००,०००/-** कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | | |
| | ५. मल्टीप्लेक्स/मॉल, रिसॉर्टकरिता प्रती मंजूरचौ.मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. | | ५. मल्टीप्लेक्स/मॉल, रिसॉर्ट, **चित्रिकरण स्टुडिओ** करिता प्रती मंजूर चौ.मी. क्षेत्रफळासाठी **रु. १५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| | ६. दुचाकी /चार चाकी शोरूम करिता प्रती मंजूर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. | | ६. दुचाकी / चार चाकी शोरूम करिता प्रती मंजूर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु.१५०/-** प्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यात यावी. |
| **१) कॅपीटेशन फी** | **क)** कारखाने, गोडावून वेअरहाउस, सिनेमागृह, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादिं मारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी घेण्यात यावी. | **१) कॅपीटेशन फी** | **क)** कारखाने, गोडावून वेअरहाउस, सिनेमागृह, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादिं इमारतीसाठी प्रती मंजुर चौ. मी. क्षेत्रफळासाठी **रु. १००/-** प्रमाणे कॅपीटेशन फी घेण्यात यावी. |

(५)

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७<br>तपशील | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर<br>तपशील |
|---|---|---|---|
| २) उंच इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची निरीक्षण शुल्क | **अ)** १५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावे.<br>**ब)** १५ मिटर पेक्षा उंच अनिवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावे.<br>**क)** कारखाने, गोडाउन, वेअरहाउस, सिनेमा थिएटर, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादिसाठी कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी.<br>**ड)** मल्टिप्लेक्स / मॉल, रिसॉर्ट इत्यादिसाठी कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी. | २) उंच इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची निरीक्षण शुल्क | **अ)** १५ ते २४ मिटर उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावी.<br>**ब)** १५ मिटर पर्यंत उंच अनिवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावी.<br>**क)** २४ ते ३५ मिटर उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/१०** पट घेण्यात यावी.<br>**ड)** ३५ ते ४५ मिटर उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/५** पट घेण्यात यावी.<br>**इ)** २४ ते ३५ मिटर उंच अनिवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी.<br>**च)** ४५ मिटर पेक्षा उंच निवासी इमारतीमधील कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी.<br>**छ)** कारखाने, गोडाउन, वेअरहाउस, सिनेमा थिएटर, नाटयगृह, पेट्रोल पंप इत्यादिसाठी कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी.<br>**ज)** मल्टिप्लेक्स / मॉल, रिसॉर्ट इत्यादिसाठी कायमस्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या **१/४** पट घेण्यात यावी. |

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७ | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर |
|---|---|---|---|
| | तपशील | | तपशील |
| ३) फायर रिपोर्ट फी | मिरा भाईंदर क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील निवासी, अनिवासी व औद्योगिक कारखान्यात आग विझविल्यानंतर त्यांना आवश्यकता भासल्यास फायर रिपोर्ट दिला जातो. सदर फायर रिपोर्टची फी रु. १,०००/- घेण्यात यावी. | ३) फायर रिपोर्ट फी | मिरा भाईंदर क्षेत्रातील किंवा क्षेत्राबाहेरील निवासी, अनिवासी व औद्योगिक कारखान्यात आग विझविल्यानंतर त्यांना आवश्यकता भासल्यास फायर रिपोर्ट दिला जातो. सदर फायर रिपोर्टची फी १,०००/- घेण्यात यावी. |
| ४) उपहार गृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट इतरसाठी नाहरकत दाखला शुल्क | उपहारगृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट व इतर साठी नाहरकत दाखला देताना रु. १,०००/- शुल्क आकारावे, तसेच नाहरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क रु. १,०००/- आकारण्यात यावे. | ४) उपहार गृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट, बिअर बार इतरसाठी नाहरकत दाखला शुल्क | उपहारगृह, केरोसिन डेपो, व्हिडीओ सेंटर व फरसाणमार्ट व इतर साठी नाहरकत दाखला देताना रु. २,०००/- शुल्क आकारावे, तसेच नाहरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क रु. १,५००/- आकारण्यात यावे. |
| ५) प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्रीसाठी व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क | प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्री, जत्रोत्सव / जत्रा व इतरसाठी नाहरकत दाखला देताना रु. २,०००/- शुल्क आकारण्यात यावे. | ५) प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्रीसाठी व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क | प्रदर्शनीय मेळा, फटाका विक्री, जत्रोत्सव / जत्रा वैयक्तीक कार्यक्रम व इतरसाठी नाहरकत दाखला देताना रु. २,०००/- शुल्क आकारण्यात यावे. |
| ६) सर्कस , फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क | सर्कस, फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला देताना रु. ५,०००/- शुल्क आकारण्यात यावे. | ६) सर्कस , फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला शुल्क | सर्कस, फन फेअर व इतरसाठी ना हरकत दाखला देताना रु. ५,०००/- शुल्क आकारण्यात यावे. |
| ७) कारखाने, गोडाउन,वेअरहाउस, सिनेमा गृह,नाटयगृह व पेट्रोल पंप इत्यादी साठी ना हरकत दाखला शुल्क | कारखाने, गोडावून इत्यादिसाठी व्यवसाय करणेकामी ना हरकत दाखला शुल्क रु. ५,०००/- व वार्षिक नुतनीकरण शुल्क रु. ३,०००/- आकारण्यात यावे. | ७) कारखाने, गोडाउन इत्यादी साठी ना हरकत दाखला शुल्क | कारखाने, गोडावून इत्यादिसाठी व्यवसाय करणेकामी ना हरकत दाखला शुल्क रु. ५,०००/- व वार्षिक नुतनीकरण शुल्क रु. ३,०००/- आकारण्यात यावे. |

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७<br>तपशील | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर<br>तपशील |
|---|---|---|---|
| ८) रिसॉर्टसाठी ना हरकत दाखला शुल्क | रिसॉर्ट व्यवसाय करणेकामी ना हरकत दाखला शुल्क **रु. ५,०००/-** वा ना हरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. ३०००/-** आकारण्यात यावे. | ८) रिसॉर्ट साठी ना हरकत दाखला शुल्क | रिसॉर्ट व्यवसाय करणेकामी ना हरकत दाखला शुल्क **रु. ५,०००/-** वा ना हरकत दाखल्याची वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. ३०००/-** आकारण्यात यावे. |
| ९) शिधावाटप दुकाने, कपडयाची दुकाने, टि.व्ही. शो रुम, रंगाचे दुकाने, इलेक्ट्रिक दुकाने, फ्रेंच पॉलीश विक्रीचे दुकान, लिकर शॉप (दारुचे दुकान) व फर्निचर दुकान इत्यादिसाठी ना हरकत दाखला शुल्क | शिधावाटप दुकाने, कपडयाची दुकाने, टि.व्ही. शो रुम, रंगाचे दुकाने, इलेक्ट्रिक दुकाने, फ्रेंच पॉलीश विक्रीचे दुकान, लिकर शॉप (दारुचे दुकान) व फर्निचर दुकान इत्यादिसाठी ना हरकत दाखला शुल्क **रु. १,०००/-** तसेच ना हरकत दाखल्याचे वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. ५००/-** आकारण्यात यावे. | ९)शिधावाटप दुकाने, कपडयाची दुकाने, टि.व्ही. शो रुम, रंगाचे दुकाने, इलेक्ट्रिक दुकाने, फ्रेंच पॉलीश विक्रीचे दुकान, लिकर शॉप (दारुचे दुकान) व फर्निचर दुकान इत्यादिसाठी ना हरकत दाखला शुल्क | शिधावाटप दुकाने, कपडयाची दुकाने, टि.व्ही. शो रुम, रंगाचे दुकाने, इलेक्ट्रिक दुकाने, फ्रेंच पॉलीश विक्रीचे दुकान, लिकर शॉप (दारुचे दुकान) व फर्निचर दुकान इत्यादिसाठी ना हरकत दाखला शुल्क **रु. २,०००/-** तसेच ना हरकत दाखल्याचे वार्षिक नुतनीकरण शुल्क **रु. १,५००/-** आकारण्यात यावे. |
| १०) फायर इंजिन, वॉटर टँकर, रेस्क्यू टेंडर, | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर अग्निशमन सेवेसाठी ३ तासापर्यत **रु. ४,०००/-** व त्यानंतर प्रत्येक तासाला **२५%** प्रमाणे वसूल करण्यात यावे. तसेच रासायनिक आग विझविण्यासाठी वापरण्यात येणारा फोम कम्पाउंड त्यावेळच्या खरेदी दराप्रमाणे वसूल करण्यात यावे. | १०) फायर इंजिन, वॉटर टँकर, रेस्क्यू टेंडर, | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या बाहेर अग्निशमन सेवेसाठी ३ तासापर्यत **रु. ४,०००/-** व त्यानंतर प्रत्येक तासाला **२५%** प्रमाणे वसूल करण्यात यावे. तसेच रासायनिक आग विझविण्यासाठी वापरण्यात येणारा फोम कम्पाउंड त्यावेळच्या खरेदी दराप्रमाणे वसूल करण्यात यावे. |
| ११) रिलायन्स एनर्जी डि.पी. बॉक्स, रिलायन्स सबस्टेशन, रिलायन्स केबल | ११) रिलायन्स एनर्जी डि.पी. बॉक्स, रिलायन्स सबस्टेशन, रिलायन्स केबल हयांना **अनु. क्र. १० प्रमाणे** दर आकारण्यात यावा. | ११) रिलायन्स एनर्जी डि.पी. बॉक्स, रिलायन्स सबस्टेशन, रिलायन्स केबल | ११) रिलायन्स एनर्जी डि.पी. बॉक्स, रिलायन्स सबस्टेशन, रिलायन्स केबल हयांना **अनु. क्र. १० प्रमाणे** दर आकारण्यात यावा. |

(८)

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७ | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर |
|---|---|---|---|
| | तपशील | | तपशील |
| १२) कर्मचारी देयक | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अग्निशमन सेवेसाठी कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्क आकारु नये परंतु रासायनिक आग असल्यास फोम कम्पाउंड वापरल्यास वरीलप्रमाणे (**अनु. क्र. १०**) नुसार रक्कम वसूल करावी.<br>अग्निशमन अधिकारी रु. ५००/-<br>लिडींग फायरमन रु. १५०/-<br>वाहन यंत्रचालक रु. १५०/-<br>फायरमन रु. १००/-<br>**अनु. क्र. १० मधील अग्निशमन सेवा शुल्क वसुल करण्यात आलेल्या रक्कमेतून अधिकारी व कर्मचारी यांना सदरची रक्कम आगीचा भत्ता म्हणुन अदा करणेत यावी.** | १२) कर्मचारी देयक | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अग्निशमन सेवेसाठी कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्क आकारु नये परंतु रासायनिक आग असल्यास फोम कम्पाउंड वापरल्यास वरीलप्रमाणे (**अनु. क्र. १०**) नुसार रक्कम वसूल करावी.<br>अग्निशमन अधिकारी रु. ५००/-<br>लिडींग फायरमन रु. १५०/-<br>वाहन यंत्रचालक रु. १५०/-<br>फायरमन रु. १००/-<br>**अनु. क्र. १० मधील अग्निशमन सेवा शुल्क वसुल करण्यात आलेल्या रक्कमेतून अधिकारी व कर्मचारी यांना सदरची रक्कम आगीचा भत्ता म्हणुन अदा करणेत यावी.** |
| १३) पोर्टेबल पंप व ट्रेलर पंप भाडे तत्वावर देणेबाबत. | एक तासासाठी **रु. २,०००/-** व त्यानंतर प्रत्येक तासासाठी **२५%** प्रमाणे रक्कम वसुल करण्यात यावी. | १३) पोर्टेबल पंप व ट्रेलर पंप भाडे तत्वावर देणेबाबत. | एक तासासाठी **रु. २,०००/-** व त्यानंतर प्रत्येक तासासाठी **२५%** प्रमाणे रक्कम वसुल करण्यात यावी. |
| १४) वॉटर टँकर पोर्टेबल पंपासहित | प्रत्येक फेरीला **रु. १,०००/-** प्रमाणे भाडे वसूल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधितांकडुन वसुल करण्यात यावा. | १४) वॉटर टँकर पोर्टेबल पंपासहित | प्रत्येक फेरीला **रु. १,०००/-** प्रमाणे भाडे वसूल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधितांकडुन वसुल करण्यात यावा. |
| १५) बंदोबस्त डयुटी | १) खाजगी कार्यक्रमासाठी व्ही. आय. पी. आले असल्यास कार्यक्रम आयोजकाकडुन **अनु. क्र. १०** प्रमाणे शुल्क वसुल करण्यांत यावे<br>२) शासकीय कार्यक्रम असल्यास शुल्क आकारु नये. | १५) बंदोबस्त डयुटी | १) खाजगी कार्यक्रमासाठी व्ही. आय. पी. आले असल्यास कार्यक्रम आयोजकाकडुन **अनु. क्र. १०** प्रमाणे शुल्क वसुल करण्यांत यावे<br>२) शासकीय कार्यक्रम असल्यास शुल्क आकारु नये. |
| १६) पेट्रोल चेन सॉ | खाजगी कामासाठी चेन सॉ भाडयाने दिल्यास प्रती तास रु. **१,०००/-** प्रमाणे भाडे वसुल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधिताकडून वसुल करण्यात यावा. | १६) पेट्रोल चेन सॉ | खाजगी कामासाठी चेन सॉ भाडयाने दिल्यास प्रती तास रु. **१,०००/-** प्रमाणे भाडे वसुल करण्यांत यावे व नादुरुस्त झाल्यास दुरुस्ती करण्यास येणारा खर्च संबंधिताकडून वसुल करण्यात यावा. |

| महसुलीचा प्रकार | अस्तित्वात असलेले ( Existing ) जुने दर<br>मा. महासभा ठराव क्र. ९३, प्रकरण क्र. १२२ दिनांक १७-०३-२००७ | महसुलीचा प्रकार | सुधारीत ( Revised ) नवीन दर |
|---|---|---|---|
| | **तपशील** | | **तपशील** |
| **१७) फायर टॅक्स** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम क्र. १२९ (क) च्या तरतूदींचा एकत्रित विचार करुन अधिनियमातील कलम ६३ (५) च्या पुर्ततेकामी सर्वसाधारण मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर **१%** अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात यावे. | **१७) फायर टॅक्स** | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम क्र. १२९ (क) च्या तरतूदींचा एकत्रित विचार करुन अधिनियमातील कलम ६३ (५) च्या पुर्ततेकामी सर्वसाधारण मालमत्ता कराच्या करयोग्य मुल्यावर **२%** अग्निशमन सेवा शुल्क आकारण्यात यावे. |
| **१८) फी** | मिरा-भाईंदर क्षेत्रात किंवा क्षेत्राबाहेर रस्त्यावर वाहनास अपघात झाल्यास किंवा इतर आणीबाणीच्या वेळेस वाहन आग विझविणेकामी किंवा बंदोबस्तकामी मागविल्यास **अनुक्रमांक १०** नुसार फी घेण्यात यावी. | **१८) फी** | मिरा-भाईंदर क्षेत्रात किंवा क्षेत्राबाहेर रस्त्यावर वाहनास अपघात झाल्यास किंवा इतर आणीबाणीच्या वेळेस वाहन आग विझविणेकामी किंवा बंदोबस्तकामी मागविल्यास **अनुक्रमांक १०** नुसार फी घेण्यात यावी. |

******************

प्राप्त दि. २८/९/९९

२८/९/९९

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. स्थायी समिती सभा दि.०७/०२/२०११.

### ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.११९ :- पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत.**

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जलजोडण्यांना त्रैमासिक पाणीपट्टी आकारण्यात येते. सदर पाणीपट्टी घरगुती जलजोडण्यांना रू.७/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रू.२८/- प्रति हजार लिटर या दराने एप्रिल २००३ पासून आकारण्यात येत आहे. सदर पाणीपट्टी दरात गेल्या सात वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानाअंतर्गत (JNNURM) केंद्र शासन, राज्य सरकार व महानगरपालिका यांच्यात करण्यात आलेल्या सामंजस्य करारनाम्यानुसार पाणी पुरवठा दरवाढ करावी लागणार आहे.

महानगरपालिकेस दररोज शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. या पाणी पुरवठ्याबाबत स्टेम प्राधिकरणास रू.४,५००/- प्रति द.ल.लि. पाणी देयक अदा करावे लागते. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास रू.८,०००/- प्रति. द.ल.लि. या दराने पाणी देयके अदा करावे लागते. सदर पाणी देयक विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असते. सदर देयकापोटी प्रदान करावयाची रक्कम व इतर पाणी पुरवठा वितरणाबाबतचा खर्च तसेच रिलायन्स एनर्जी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील वीज दरात मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ या सर्व बाबींचा विचार करता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला आता सरासरी ९८ द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा सरासरी ३६ ते ४० तासांतून २ ते ३ तास केला जातो. शहराच्या लोकसंख्या वाढीचा वेग आशिया खंडात प्रथम क्रमांकावर आहे. सध्या पुरवठा होत असलेले पाणी ३६ ते ४० तासांनी होत असून आठवड्यातून एक दिवस पाणी बंद झाल्यास तद्नंतर ६० ते ७० तासांनी पुरवठा केला जातो. याचा विचार करता नविन पाणी पुरवठा योजना हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र व राज्य मिळून ५० टक्के निधी व ५० टक्के निधी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था आतापासून करावी लागणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न पाहता कर्ज घेण्याची ऐपत संपलेली आहे. तसेच शहरास दररोज पाणी पुरवठा करावयाचा असल्याने दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे.

एप्रिल २०१० पासून महानगरपालिकेची जकात वसुली बंद होणार आहे. पर्यायाने पुर्वानुभव लक्षात घेता महानगरपालिकेच्या उत्पन्नात फार मोठी घट होण्याची शक्यता आहे.

अशा प्रकारे सद्यस्थिती लक्षात घेता पाणीपट्टी दरात वाढ करणे हाच केवळ एकमेव पर्याय आहे. सबब सध्या सुरू असलेल्या पाणीपट्टी दरात वाढ करून ते घरगुती जलजोडण्यांना रू.१०/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रू.४०/- प्रति हजार लिटर इतके करणेस शिफारस आहे. दि.०१ एप्रिल २०१० नंतर बांधकाम परवानगी प्राप्त करणाऱ्या बांधकामांना रू.३५,०००/- इतके नविन जलजोडणी शुल्क आकारणेसही शिफारस आहे. बार, रेस्टॉरंट, शॉपिंग मॉल व सर्व्हिस सेंटर यांना रू.५०,०००/- इतके नविन जलजोडणी शुल्क आकारणेस शिफारस आहे.

महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणीकरीता सध्या आकारण्यात येणारे जलजोडणी शुल्क व इतर शुल्क जून २००२ पासून लागू करण्यात आलेले आहेत. मात्र सदर शुल्कात गेल्या सात वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांची पगारवाढ फार मोठ्या प्रमाणात झालेली आहे. यामुळे दुरूस्ती व जलजोडणी खर्चातही वाढ करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवरील व इतर योजनेवरील खर्च लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतूदीप्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या करात अनुपूरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतूदीच्या अधिन राहून महानगरपालिकेने या आर्थिक वर्षात वरील शुल्कात सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वाढ करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे मा. स्थायी समिती सभेपुढे निर्णय घेण्यास शिफारस असे.

आयुक्त

मिरा-भाईंदर महानगरपालिका

ग्राह्य

5/2/2011

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग

नवीन जलजोडणी शुल्क – नवीन दर

| अ.क्र. | तपशील | गावठण जुने स्वतंत्र घर १/२" | रो हाउस बंगला/पक्के वयैक्तिक बांधकाम १/२" | कोणत्याही व्यवसायासाठी १/२" | इमारत/व्यवसाय १" | | ग्रुप. कने. १/२" | ग्रुप. कने. १" |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | इमारत | व्यवसाय | | |
| १ | नवीन जलजोडणी शुल्क | ५,०००/- | २०,०००/- | २५,०००/- | ३५,०००/- | ५०,०००/- | ६०००/- | १०,०००/- |
| २ | अनामत | ७५०/- | ७५०/- | १०००/- | १२५०/- | २०००/- | ७५०/- | १२५०/- |
| ३ | बोरींग | २००/- | २००/- | ३००/- | ४००/- | ५००/- | २००/- | ४००/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | खड्डा दुरूस्ती शुल्क | १. डांबरी रस्ता = ५७०/- प्रति मिटर<br>२. कॉक्रिट रस्ता = ४१०/- प्रति मिटर |
| ५ | रस्ता क्रॉसिंग | १. डांबरी रस्ता = ३४०/- प्रति मिटर<br>२. सिमेंट कॉक्रिट = २५०/- प्रति मिटर |

(१)

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मा.विशेष स्थायी समिती सभा दि.०७/०२/२०११.**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. १२० :- मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात फी (कर) चे दर वाढविणे बाबत.**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ आणि ३९२ अन्वये व मुबंई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम -२००३ अन्वये जाहिराती व आकाशचिन्ह इत्यादीवर नियंत्रण करण्याची तरतूद आहे. त्या अनुषंगे मिरा भाईदर क्षेत्रातील जाहिरातीच्या (विविध भागात होर्डिग्ज (आकाशचिन्ह), कमानी, व्यापारी आस्थापनेवरील जाहिराती,दुकानांवरील जाहिरात फलक व अन्य प्रकारच्या जाहिराती) वाढ होण्याच्या दृष्टीने मा.स्थायी समिती ठराव क्र.४३, दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३५,दि.१९/०३/२००८ अन्वये (सन २००८-०९ मध्ये) जाहिरात फी चे दरपत्रकास मंजुरी देण्यात आली होती ती खालीलप्रमाणे.

**दि.०१/०४/२००८ (सन २००८-०९) पासून लागू करण्यात आलेले जाहिरात फी चे दरपत्रक**

तक्ता - अ

| अ.क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रति चौ.फुट प्रति महिना | वार्षिक |
| १ | इमारतीच्या भितींवरील जाहिरात (लिखाण) | १० चौ.फुटापर्यत<br>१० चौ.फुटावरील | रु४/-<br>रु.३/- | रु.४८/-<br>रु.३६/- |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यत | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ.फुटावरील | रु.३/- | रु.३६/- |
| ३ | कागदी पोस्टर्स | | | |
| | अ) सिनेमा व व्यापारी | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.५/- | रु.६०/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.१०/- | रु.१२०/- |
| | ब) इतर | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.२/- | रु.२४/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.४/- | रु.४८/- |
| ४ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | १) १.५X २.५ प्रति ौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.२०/- | रु.२४०/- |
| | | २) २.५X ३.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.२०/- | रु.२४०/- |
| | | ३) २.५X ५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.५०/- | रु.६००/- |
| ५ | दुकानांवरील नावाचे फलक | | निरंक | निरंक |
| | | | निरंक | निरंक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | दुकानांवरील जाहिरातीचे फलक | १० चौ.फुटापर्यंत | रु.३/- | रु.३६/- |
| | | ११ चौ.फुट ते २० चौ.फुट | रु.४/- | रु.४८/- |
| | | २० चौ .फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| ७ | भिंतीवरील जाहिरात (लिखाण व चित्र) | १० चौ.फुटापर्यंत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटापर्यंत | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ८ | वाहनांवरील जाहिरात | १० चौ.फुटापर्यंत | रु.१०/- | रु.१२०/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटावरील | रु.५/- | रु.६०/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.२/- | रु.२४/- |
| ९ | होर्डिग्ज (आकाशचिन्ह)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ.फुटापर्यंत | रु.४/- | रु.४८/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुट | रु.३/- | रु.३६/- |
| | | ३०० चौ .फुटावरील | रु.२.५/- | रु.३०/- |
| १० | बस थांब्यावरील जाहिराती | १ चौ.फुटास | रु.४/- | रु.४८/- |
| ११ | रोड शोज | रस्त्यावर १० ठिकाणापर्यंत (प्रति नगास रु.१००) | रु.१००० प्रतिदिन/प्रती रस्ता | रु.१००० प्रतिदिन/प्रती रस्ता |
| | | आकाशातील प्रदर्शन | रु.५००/- प्रती शो | रु.५००/- प्रती शो |
| | | एरियल बॅनर्स | रु.५०००/- प्रतीदिन/बॅनर | रु.५०००/- प्रतीदिन/बॅनर |
| | | रस्त्यावर हॅडबिल टाकणे/वाटणे | रु.१२५/-प्रति हजारी नग | रु.१२५/-प्रति हजारी नग |
| | | रस्त्यावरील लिखाण | रु.२/- प्रति चौ.फुट प्रति महिना | रु.२/- प्रति चौ.फुट प्रति महिना |
| १२ | चलत जाहिरात **(Moving advertisement having multiple display)** | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | जाहिरात फी व जाहिरात फी च्या ३० टक्के रक्कम |

**१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५०% व १००% अतिरिक्त फी आकारण्यात येईल.**
**२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात फलकासाठी एकूण फी च्या २०% जादा फी आकारण्यात येईल.**
**३) फक्त खाजगी जागेतील होर्डिग्ज यांना जाहिरात फी च्या ३०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.**

सन २००८-०९ मध्ये महापालिका क्षेत्रातील महापालिकेच्या जागेवर वरील नमुद केलेल्या ठरावातील दरपत्रकाप्रमाणे १३० होर्डिग्जकरीता निविदा मागविल्या असता १०X२० चौ.फुटाच्या (क्षेत्रफळ २०० चौ.फुट) होर्डिग्जकरीता प्रति होर्डिग्ज मासिक दर रु.४००१/- प्राप्त झाला आहे. तसेच माहे डिसेंबर २००९ मध्ये दुस-या टप्प्यातील ९० होर्डिग्जकरीता प्रति होर्डिग्ज मासिक दर रु.४००१/- प्राप्त झालेला आहे. यावरुन निविदेमध्ये प्राप्त दरानुसार महानगरपालिकेच्या जागेवरील अे दर्जाच्या रस्त्याकरीता प्रति चौ.फुटास रु.२०/- इतका दर प्राप्त झाल्याचे दिसून येते.

तदनंतर निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरास मध्य नजर ठेवून खाजगी जागेत ठिकाणी उभारण्यात येणा-या होर्डिंग्जधारकांकडून निविदेत प्राप्त झालेल्या दराप्रमाणे दर प्राप्त व्हावेत. याकरीता जाहिरात विभागामार्फत सन २००९-१० मध्ये जाहिरातीमधील फक्त दोन लेखाशिर्षकांना दरवाढ करण्यास मा.स्थायी समिती सभेमध्ये विषय ठेवून मा.स्थायी समिती ठराव क्र.१०१, दि.०२/०२/२०१० अन्वये खालील दर्शविलेल्या प्रमाणे मंजुरी घेवून महासभेस मंजुरीकरीता शिफारस केली होती. परंतु सदरहू विषय दि.३१/०३/२०१० रोजीच्या मा.महासभेपुढे (मा.सर्वसाधारण) ठेवण्यात आलेला नाही.

**नविन प्रस्तावित दर मा.महासभेच्या मंजुरीकरीता**
**सन २००९-१०**
**तक्ता - ब**

| | माहे १ एप्रिल २००८ पासून लागू असलेले दर | | | | नविन प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | जाहिरातीचे दर | | प्रति १ चौ.फुट प्रति महिना | वार्षिक रुपये |
| | | | मासिक रुपये (प्रति चौ.फुटास) | वार्षिक रुपये | | |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यत<br>१० चौ.फुटावरील | रु.५/-<br>रु.३/- | रु.६०/-<br>रु.३६/- | रु.१०/- | रु.१२०/- |
| ९ | होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ.फुटापर्यत<br>२०० ते ३०० चौ.फुट<br>३०० चौ.फुटावरील | रु.४/-<br>रु.३/-<br>रु.२.५/- | रु.४८/-<br>रु.३६/-<br>रु.३०/- | रु.१०/- | रु.१२०/- |

वरील तक्ता ब पाहता सर्व आकारमानांकरीता सारखा दर नमुद केलेला दिसून येतो. तसेच वरील तक्त्यामध्ये १०० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दरवाढ झाल्याचे दिसून येते. सदरची दरवाढ लागू करुन जाहिरातधारकाकडून त्याप्रमाणे वसूली केल्यास खाजगी होर्डिंग्जचे धारक हरकती घेतील असे वाटते. कारण खाजगी जागेत होर्डिंग्ज उभारताना (महापालिकेची जागा सोडून) होर्डिंग्जधारक जागेच्या मालकाला वार्षिक भाडे देत असतो. तसेच बाजारमुल्याप्रमाणे किंवा महागाईचे वाढते मुल्य विचारात घेता प्रतिवर्षी १० टक्के दरवाढ करणे अभिप्रेत आहे. त्या अनुषंगे यापुर्वी केलेल्या निवेदनात ठराव क्र.१०१ मध्ये नमुद केलेली दरवाढ संयुक्तिक वाटत नाही. याकरीता यापुर्वी निविदेनातील ठराव क्र.१०१ रद्द करणे उचित वाटते.

मा.स्थायी समिती ठराव क्र.४३, दि.२९/०२/२००८ व मा.महासभा ठराव क्र.३५,दि.१९/०३/२००८ अन्वये दि.०१/०४/२००८ (सन २००८-०९) पासून जाहिरात फी लागू करण्यात आलेले आहे. परंतु सन २००९-१०,२०१०-११ या वर्षामध्ये जाहिरात दरामध्ये कोणत्याही प्रकारची दर वाढ झालेली नाही.

बाजारमुल्यप्रमाणे किंवा महागाईचे वाढते मुल्य विचारात घेता प्रतिवर्षी दहा टक्के दरवाढ करणे अभिप्रेत आहे. या कारणास्तव सन २००९-१० व २०१०-११ या दोन वर्षामध्ये प्रतिवर्षी दहा टक्के प्रमाणे दरवाढ न झाल्यामुळे या वर्षाची वीस टक्के दरवाढ, तसेच सन २०११-१२ मध्ये दहा टक्के दरवाढ अशी एकूण सन २०११-१२ करीता तीस टक्के दरवाढ केल्यास जाहिरात धारकांचे हरकती येउ शकणार नाहीत असे वाटते. व अशा प्रकारे दरवाढ करण्यास संयुक्तिक वाटते. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे-

## जाहिरातीचे नविन प्रस्तावित दर

**(दि.०१/०४/२०११ (सन २०११-१२) पासून लागू करण्याकरीता जाहिरात फी चे दरपत्रक)**

**तक्ता - क**

| अ.क्र | जाहिरातीचे प्रकार | मोजमाप | | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रति चौ.फुट प्रति महिना | वार्षिक |
| १ | इमारतीच्या भितींवरील जाहिरात (लिखाण) | १० चौ.फुटापर्यत<br>१० चौ.फुटावरील | रु.५.२०/-<br>रु.४/- | रु.६२.५०/-<br>रु.४८/- |
| २ | कापडी फलक (बॅनर्स)/कटाउट | १० चौ.फुटापर्यत | रु.६.५०/- | रु.७८/- |
| | | १० चौ.फुटावरील | रु.४/- | रु.४८/- |
| ३ | कागदी पोस्टर्स | | | |
| | अ) सिनेमा व व्यापारी | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.६.५०/- | रु.७८/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.१३/- | रु.१५६/- |
| | ब) इतर | १० चौ.फुटापर्यत (एका नगास) | रु.३/- | रु.३६/- |
| | | १० चौ .फुटावरील (प्रत्येक नगास) | रु.५.२०/- | रु.६२.५०/- |
| ४ | दिव्याचे खांबावरील फलक (किऑस्क) प्रदर्शित दर्शनी आकार | १) १.५X २.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.२६/- | रु.३१२/- |
| | | २) २.५X ३.५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.३०/- | रु.३६०/- |
| | | ३) २.५X ५ प्रति चौ.फुट (सर्व बाजूसाठी) | रु.६५/- | रु.७८०/- |
| ५ | दुकानांवरील नावाचे फलक | | निरंक | निरंक |
| | | | निरंक | निरंक |
| ६ | दुकानांवरील जाहिरातीचे फलक | १० चौ.फुटापर्यत | रु.४/- | रु.४८/- |
| | | ११ चौ.फुट ते २० चौ.फुट | रु.५.००/- | रु.६२.५०/- |
| | | २० चौ .फुटावरील | रु.६.००/- | रु.७८/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | भिंतीवरील जाहिरात (लिखाण व चित्र) | १० चौ.फुटापर्यंत | रु.६.५०/- | रु.७८/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटापर्यंत | रु.६/- | रु.७२/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.३/- | रु.३६/- |
| ८ | वाहनांवरील जाहिरात | १० चौ.फुटापर्यंत | रु.१३/- | रु.१५६/- |
| | | ११ ते ३० चौ.फुटावरील | रु.६.५०/- | रु.७८/- |
| | | ३१ चौ .फुटावरील | रु.३/- | रु.३६/- |
| ९ | होर्डिंग्ज (आकाशचिन्ह)/कमानी (मोठे जाहिरात फलक) | २०० चौ.फुटापर्यंत | रु.५.२०/- | रु.६२.५०/- |
| | | २०० ते ३०० चौ.फुट | रु.४/- | रु.४८/- |
| | | ३०० चौ .फुटावरील | रु.३.५०/- | रु.४२/- |
| १० | बस थांब्यावरील जाहिराती | १ चौ.फुटास | रु.५.५०/- | रु.६६/- |
| ११ | रोड शोज | रस्त्यावर १० ठिकाणापर्यंत (प्रति नगास रु.१००) | रु.१००० प्रतिदिन/प्रती रस्ता | रु.१००० प्रतिदिन/प्रती रस्ता |
| | | आकाशातील प्रदर्शन (वायूगोल/बलून) | रु.५००/- प्रती शो /प्रती दिन | रु.५००/- प्रती शो/प्रतिदिन |
| | | एरियल बॅनर्स | रु.५०००/- प्रतीदिन/प्रति बॅनर | रु.५०००/- प्रतीदिन/बॅनर |
| | | रस्त्यावर हॅंडबिल टाकणे/वाटणे | रु.१५०/-प्रति हजारी नग | रु.१५०/-प्रति हजारी नग |
| | | रस्त्यावरील लिखाण | रु.२/- प्रति चौ.फुट प्रति महिना | रु.२/- प्रति चौ.फुट प्रति महिना |
| १२ | चलत जाहिरात **(Moving advertisement having multiple display)** | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | क्र.६ प्रमाणे (प्रत्येक जाहिरातीस) | जाहिरात फी व जाहिरात फी च्या ३० टक्के रक्कम |
| १३ | चल जाहिरात (Trivision) किंवा इलेक्ट्रॉनिक्स स्क्रोलर जाहिरात | क्र.६ प्रमाणे (जेवढया जाहिराती प्रदर्शित होतात त्या सर्व जाहिरातीच्या एकत्रित आकारमानावरती) | क्र.६ प्रमाणे (जेवढया जाहिराती प्रदर्शित होतात त्या सर्व जाहिरातीच्या एकत्रित आकारमानावरती) | क्र.६ प्रमाणे (जेवढया जाहिराती प्रदर्शित होतात त्या सर्व जाहिरातीच्या एकत्रित आकारमानावरती) |

**१) सदर जाहिरातींचे दर क दर्जाच्या रस्त्यासाठी आहेत. ब व अ दर्जाच्या रस्त्यासाठी या दरावर अनुक्रमे ५०% व १००% अतिरिक्त फी आकारण्यात येईल.**

**२) वरील जाहिरात फी दर हे फक्त अप्रकाशित जाहिरात फलकासाठी असून प्रकाशित जाहिरात (ग्लोसाईन बार्ड/निऑन साईन बोर्ड, इत्यादी बोर्ड) फलकासाठी एकूण फी च्या २०% जादा फी आकारण्यात येईल.**

**३) फक्त खाजगी जागेतील होर्डिंग्ज यांना जाहिरात फी च्या ३०% कमी दराने जाहिरात फी आकारण्यात येईल.**

**४) वरीलप्रमाणे होर्डिंग्जचे वाढविण्यात आलेले दर हे फक्त खाजगी जागेतील होर्डिंग्जकरीता लागू आहेत. (अ.क्र.९ करीता)**

वरील क तक्त्यामध्ये नमुद केलेले नविन सुधारीत दर दि.०१/०४/२०११ (सन २०११-१२) पासून लागू करण्याचा निर्णय घेतल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक महसूलात वाढ होईल.

वरीलप्रमाणे जाहिरात कराच्या दरवाढीचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवणेस मान्यतेसाठी सादर...

उपआयुक्त (मु.)
मिरा भाईदर महानगरपालिका

प्राप्त दि. ५/२/११

५/२/११